# ढगाळ हवामानासोबत आता पावसाच्या सरीही बरसल्या

## पिकांवर रोगराईचा धोका | शेतकरी पुन्हा चिंतेत

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 )** – मागील आठवड्यात रब्बी हंगामातील पिकांना पोषक अशी थंडी पडत होती. मात्र, आठवड्यापासून थंडी गायब होऊन हवामानात बदल झाला. दररोज दिवसभर ढगाळ वातावरण राहत आहे. हे ढगाळ वातावरण असताना गुरुवारी( दि.5) जिल्ह्यातील काही भागात पावसाच्या सरी बरसल्याने रब्बी पिकावर रोगराईची भीती आणखीनच वाढली आहे.



ढगाळ हवामान व पावसामुळे रब्बीतील कांदा, गहू, ज्वारी, हरभरा, तूर, पालेभाज्या आदी पिकांना रोगराईचा प्रादुर्भाव होण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामूळे बळीराजा धास्तावल्याचे चित्र अचलपूर, अंजनगाव, मेळघाट परिसरात पहायला मिळत आहे. मागील आठवड्यात रब्बी हंगामातील पिकांना पोषक अशी थंडी पडत होती. मात्र, आठवड्यापासून थंडी गायब होऊन हवामानात बदल झाला. सध्या जिल्ह्यात गहू, हरभरा, ज्वारी, मका, कांदा आदी पिकांची पेरणी अंतिम टप्प्यात आली असून, पेरलेली पिके जोमात आली आहेत. कांद्याच्या रोपांचे तरवे तयार झाले आहेत. काही ठिकाणी कांदा लागण सुरू आहे, तर काही ठिकाणी पेरणी केलेला कांदा उगवून जोर धरू लागला आहे. मागील काही दिवसांपासून वातावरणाचा नूर पालटला असून, ढगाळ हवामान तयार झाले आहे.

### कीडरोगाची भीती!

ढगाळ वातावरणामुळे पिकांवर अळ्यांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. विशेषत: तूर, हरभऱ्याच्या पिकावर अळीचा, तर तुरीवर पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव वाढू शकतो. बदलत्या वातावरणामुळे तुरीचा बहर गळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

### भाजीपिकाला फटका

अचलपूर तालुक्यात सध्या मोठ्या प्रमाणात भाजी लागवडीचे काम सुरू असून अनेक शेतकऱ्यांनी पालेभाज्या तसेच इतर भाज्यांची लागवड केली आहे मात्र सध्याच्या ढगाळ वातावरणाचा फटका भाजीपाला पिकाला देखील बसण्याची शक्यता असून शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. जिल्ह्यात अंशत: ढगाळ ते ढगाळ वातावरण राहील असे हवामान विभागाने सांगितले.

### तुरीची फुलगळती सुरू

शेतकऱ्यांनी पेरणी केल्यापासूनच निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांच्या हातून सर्वच पिके गेली आहेत. त्यातच आता ढगाळ वातावरणाचा फटकाही तूर पिकाला बसत असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. यावर्षी सुरुवातीपासून चांगला पाऊस होता. शेतकऱ्यांची पिके जोमदार दिसत होती. परंतु, निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकयांच्या हातून पिके गेली आहेत. त्यामुळे शेतकरी मोठ्या अडचणीत सापडला. बांधावरील तुरीचे पीक चांगले येईल अशी शेतकऱ्यांना आशा होती. माञ ढगाळ वातावरणाने तुरीच्या पिकाला चांगलाच फटका बसत आहे. फुलगळ होऊन अळ्यांचा प्रादुर्भाव झाल्याने शेतकऱ्यांच्या हातून तूरपिक देखील पीक जाते की काय? अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

# देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेताच कार्यकर्त्यांचा आनंदोत्सव

## धामणगावात वाजले ढोल ताशे ; फुटले फटाके

### तीन क्विंटल लाडूचे वाटप

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.5 )**– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेताच धामणगाव तालुक्यात ढोल ताशे वाजले आणि फटाके फुटले तीन क्विंटल लाडूचे वाटप करून जल्लोष करण्यात आला.

गुरुवारला देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेताच,महायुती भाजपा पदाधिकारी, कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह संचारला होता. स्थानिक शास्त्री चौकात भाजपाचा विजय साजरा केला. आमदार प्रतापदादा तुम आगे बढो अशा घोषणा देत ढोल ताशे, फटाक्यांची आतषबाजी आणि लाडू वाटून देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्याचा आनंद साजरा करण्यात आला. दरम्यान आ प्रताप अडसड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना शुभेच्छा दिल्या धामणगाव रेल्वे विधानसभा मतदार संघावर भाजपाने सलग दुसऱ्यांदा झेंडा फडकवला आहे. प्रताप अडसड आमदार म्हणून पुन्हा निर्वाचित झाल्याने भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह आणि आत्मविश्वानस आहे.



### राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांचा जल्लोष

अमरावती –महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 मध्ये जनतेने महायुती सरकारच्या बाजूने प्रचंड मताधिक्याचा कौल दिल्या नंतर गुरूवार 5 डिसेंबर रोजी राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकार मध्ये राष्टवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार यांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी ना.अजितदादा पवार हे सहाव्यांदा विराजित झाल्याबद्दल अमरावती रेल्वे स्टेशन चौक स्थित आ. सुलभा संजय खोडके यांच्या जनसंपर्क कार्यालय येथे जल्लोष साजरा करण्यात आला. मुंबई येथील शपथविधी सोहळ्याचे टीव्हीवरून थेट प्रक्षेपण सुरु असतांना 'मी अजितदादा आशाताई अनंतराव पवार गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो की'... हा 'शब्द कानी पडताच कार्यकर्त्यांनी टाळ्यांचा कडकडाट करून प्रचंड उत्साहात आपल्या लाडक्या लोकनेत्याचा आनंदोत्सव साजरा केला. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी करीत ढोल ताश्यांच्या गजरात तसेच मिठाई वाटून राज्याच्या उपमुख्यमंत्रीपदी अजितदादा पवार सहाव्यांदा विराजित झाल्याबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने प्रचंड प्रमाणात जल्लोष साजरा करण्यात आला.

# दुकानाचे बोर्ड मराठीत बंधनकारक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती( दि.5 )** – व्यापारी प्रतिष्ठानांचे नाम फलक मराठीत असणे आता बंधनकारक करण्यात आल्याचे स्पष्ट आदेश अमरावती महानगरपालिका उपायुक्त मेघना वासनकर यांनी काढले आहे. अमरावती मनपा क्षेत्रातील प्रत्येक दुकान व कार्यालयाचा फलक मराठी म्हणजेच देवनागरी लिपीत लिहिणे बंधनकारक करण्यात आले आहे. याबाबत उपायुक्त मेघना वासनकर यांनी स्पष्ट व कडक निर्देश दिले आहेत. ज्या दुकानांवर, शोरूमवर आणि कार्यालयांवर देवनागरी लिपीत नाव नाही किंवा ज्यांचे नाव इंग्रजी किंवा अन्य भाषेत लिहिलेल्या नावापेक्षा लहान असेल, अशा दुकानांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे आदेशात म्हटले आहे. आदेशानुसार, महाराष्ट्र दुकाने आणि आस्थापना कायदा, 2017 अंतर्गत, प्रत्येक आस्थापनाची नावाची पाटी मराठी देवनागरी लिपीतच असावी. असे आदेशाचे प्रसिद्धीपत्रक जारी करून महापालिका क्षेत्रातील सर्व आस्थापना आणि दुकानदारांना कळविले आहे. संबंधित दुकानदाराच्या व्यवसाय परवान्याचे नूतनीकरण करावे. अन्यथा संबंधित आस्थापनाधारक/दुकानदार कारवाईस पात्र राहतील, असे महापालिकेने जारी केलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# आजाराला कंटाळून इसमाची झाडाला गळफास लावून आत्महत्या

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 )**– आजाराला कंटाळून एका इसमाने झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. नारायण रामराव टाले (55, रा. टेकडीपुरा, भातकुली) असे मृताचे नाव आहे. या घटनेची माहिती मोहन नारायण टाले यांनी 4 डिसेंबर रोजी भातकुली पोलिसांना दिली. त्यानुसार पोलिसांनी आकस्मिक मृत्युची नोंद केली आहे.

नारायण टाले हे गेल्या वर्षभरापासून शरिरात जळजळ होण्याच्या व शरिर दुखण्याचा त्रास सहन करीत होते. ते जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार घेत होते. परंतू अंगदुखीचा वेदना त्यांना असह्य झाल्या होत्या. त्यामुळे ते मानसिक तणावात राहत होते. 3 डिसेबर रोजी रात्री ते जेवण करून घराबाहेर पडले. त्यावेळी कुटुंबीय घरात झोपले होते. 4 डिसेबर रोजी कुटुंबीयांना नारायण टाले घरात दिसले नाही. त्यामुळे त्यांनी त्यांचा शोध सुरु केला. त्यावेळी त्यांचा मृतदेह नदीकाठी असणार्या गुलमोहराच्या झाडावर लटकलेल्या अवस्थेत दिसला. या घटनेची माहिती भातकुली पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा करीत पुढील कार्यवाही केली.


**PROFECTUS CAPITAL** प्रोफेक्टस कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड

नोंदणीकृत/कॉर्पोरेट/शाखा कार्यालय:-, बी/१७, चौथा मजला, आर्ट गिल्ड हाऊस, फिनिक्स मार्केटसिटी मॉलच्या मागे, लाल बहादूर शास्त्री मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई, ४०००७०

**स्थावर मालमत्तेच्या विक्री/लिलावासाठी सार्वजनिक सूचना**

(सरफेसी कायद्यांतर्गत सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियमांच्या नियम ८ (६) च्या तरतूदीसह वाचा)

तर प्रॉफेक्टस कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेडचे अधिकृत अधिकारी. (यापुढे 'प्रॉफेक्टस' म्हणून संदर्भित), आर्थिक मालमत्तेचे सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन अँड इनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट क्ट, २००२ अंतर्गत (थोडक्यात 'सरफेसी कायदा) आणि सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम, २००२ सह वाचलेल्या कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून कलम अंतर्गत मागणी सूचना जारी केली. १३(२) सरफेसी कायदा खाली नमूद केलेल्या कर्जदार/सह-कर्जदार/गहाण/गहाणदारांना नोटीसमध्ये नमूद केलेली रक्कम कराराच्या दराने पुढील व्याजासह परतफेड करण्याचे आवाहन करणे तसेच पेमेंटच्या तारखेपर्यंत सर्व खर्च शुल्क आणि आनुषंगिक खर्च इ. या नोटिसच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत.

खालील कर्जदार/सह-कर्जदार/गहाणखत/जमीनदार वरील रकमेची विनिर्दिष्ट कालावधीत परतफेड करण्यात अयशस्वी झाले आहेत. याद्वारे सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषत: कर्जदार आणि सह-कर्जदारांना सूचना देण्यात येत आहे की, सुरक्षिततेसह वाचलेल्या सरफेसी कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून अधिकृत अधिकाऱ्याने ताबा घेतला आहे. व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२, ज्याची लिलावाद्वारे जशी आहे तेथे आहे, जशी आहे तशी आहे, जे काही आहे ते आधार आहे, आणि कोणताही आधार नाही यानुसार रु.च्या वसुलीसाठी विक्री केली जाईल. १४.०५.२०२४ रोजी १,३४,४१,९८६/- (रुपये एक कोटी चौतीस लाख एकचाळीस हजार एकोणऐंशी फक्त) थकबाकी, प्रोफेक्टस कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड, (सुरक्षित कर्जदार) पुढील व्याजासह आणि अतिरिक्त/दंडासह, सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ आणि ९ अंतर्गत प्रॉफेक्टसमुळे, खालील लिलाव वेळापत्रकानुसार निविदा/बिड आमंत्रित करून आणि इतर अटी व शर्ती https://www.profectuscapital.com वेबसाइटवर तपशीलवार पाहावयास मिळेल.

लिलाव वेळापत्रक

| | |
|---|---|
| मालमत्तेचे/घराचे वर्णन ज्यामध्ये : भूखंड क्रमांक ८ चा उत्तरेकडील भाग असून जमिनीचा सर्व तुकडा आणि पार्सल आहे, ज्यामध्ये मोजमाप १६१.२५ चौ. एमटी (म्हणजे १७३५ चौ. फूट) क्षेत्रफळापैकी ३४७० चौरस फूट जमीन खसरा नं. १४ मौजा जेवद यासह त्यावर उभी असलेली रचना व घर क्रमांक १३९० हे प्रभाग क्रमांक ६०, अमरावती येथे महानगरपालिकेच्या हद्दीत आहे. महामंडळ, अमरावती. | |
| ज्ञात भार (असल्यास):- प्रॉफेक्टसला ज्ञात नाही | |
| राखीव किंमत (रु. मध्ये) रु. १,४७,५७,०००/- (रुपये एक कोटी सत्तेचाळीस लाख सत्तावन्न हजार फक्त) | |
| 'प्रोफेक्टस कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड' च्या नावे डीडी/पीओ द्वारे बयाणा रक्कम जमा (रु. मध्ये). नागपूर येथे देय: रु. १४,७५,७००/- (रुपये चौदा लाख पंचाहत्तर हजार सातशे फक्त) | |
| बोली वाढीव रक्कम: रु. १,००,०००/- | बिड वाढीव वेळ:-एक मिनिट |
| ईएमडीसह सीलबंद ऑफर/निविदा सादर करण्याची शेवटची तारीख, वेळ आणि स्थळ: २१/१२/२०२४ पर्यंत नवीनतम साय ०४:०० वा युनिट क्रमांक ३-२०१ येथे, दुसरा मजला, थापर एन्क्लेव्ह, प्लॉट क्रमांक १४८, रामदासपेठ, नागपूर - ४४००१०, भारत | |
| बोली उघडण्याची तारीख, वेळ आणि ठिकाण. २३/१२/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता युनिट क्रमांक ३-२०१, दुसरा मजला, थापर एन्क्लेव्ह, प्लॉट क्रमांक १४८, रामदासपेठ, नागपूर - ४४००१०, भारत. | |
| मालमत्तांची तपासणी: ०९/१२/२०२४ ते ११/१२/२०२४ सकाळी ११ ते दुपारी ४ दरम्यान. | |
| निविदा / बोली सह लिलाव फॉर्मची किंमत: शून्य | |
| अयशस्वी बोलीदारांच्या ईएमडीचा परतावा: लिलावाच्या तारखेपासून सात कामकाजाच्या दिवसांच्या आत. | |
| पुष्टी केलेल्या यशस्वी बोलीदारासाठी स्वीकृत सर्वोच्च बोलीच्या २५% भरण्याची शेवटची तारीख (ईएमडीसह): बिड पुष्टीकरणाच्या तारखेपासून पुढील कामकाजाच्या दिवसापर्यंत पेमेंट नवीनतम केले जावे. | |
| सर्वोच्च बोलीच्या ७५% शिल्लक रक्कम भरण्याची शेवटची तारीख: बोली/विक्री पुष्टीकरणाच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत | |
| कर्जदाराचे तपशील | |
| कर्जदार/सह-कर्जदार/जमीनदार/गहाण ठेवणारे नाव: १. ज्ञानेश्वर बहाले (अंबा एस एस किचन ट्रॉली) रुपाली ज्ञानेश्वर बहाळे | |
| मागणी सूचनेची तारीख यु/एसएक. सरफेसी कायदा १३(२): १४ मे २०२४ | |
| एमटी. सरफेसी कायद्याच्या यु/एस-१३(२) च्या डिमांड नोटिस (रु. मध्ये): रु. १,३४,४१,९८६/- (रुपये एक कोटी चौतीस लाख एकचाळीस हजार एकोणऐंशी फक्त) | |
| ताबा मिळण्याची तारीख:- २६ जुलै २०२४ | |
| ताबा सूचना प्रकाशन तारीख: ३० जुलै, २०२४ | |
| १४.०५.२०२४ रोजीची थकबाकी (रु. मध्ये) रु. १,३४,४१,९८६/- | |

इच्छुक पक्ष अधिकृत अधिकारी श्री मंगेश पाटील यांच्याशी संपर्क साधू शकतात (ईमेल- mangesh.patil@profectuscapital com अधिक तपशील / स्पष्टीकरणासाठी आणि त्यांचा अर्ज सबमिट करण्यासाठी संपर्क साधू शकतात.

स्वा/-
अधिकृत अधिकारी. लि.
प्रोफेक्टस कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड साठी

तारीख: ०६.१२.२०२४







# सरत्या वर्षात खुनाचे 100 टक्के गुन्हे उघडकीस


## गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा गुन्हे कमी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 )** – गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा 2024 मध्ये अमरावती जिल्ह्यातील ग्रामिण भागात गुन्ह्याचा आलेख घसरल्याचे आकडेवारीतून दिसून येत आहे. सन 2023 मध्ये विविध प्रकारच्या एकूण 7567 गुन्हे नोंदविण्यात आले होते. त्यापैकी 5862 गुन्हे उघडकीस आणण्यात यश मिळाले. तर यावर्षी नोव्हेंबरपर्यंत 7303 गुन्ह्यांची नोंद झाली असून, त्यापैकी 5847 गुन्हे उघडकीस आली आहेत. त्यामुळे गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा गुन्हे कमी झाल्याचे दिसून आले आहे.

**100 टक्के खुनाचे गुन्हे उघडकीस**

ग्रामीण पोलिसांनी 2023 आणि 2024 या वर्षात खुनाचे 100 टक्के गुन्हे उघडकीस आणून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पोलिसांनी गुन्हेगारांवर कडक कारवाई करत प्रत्येक खुनाच्या गुन्ह्यातील आरोपींना अटक करण्यात यश मिळविले. नोव्हेंबर 2023 पर्यंत एकूण 59 खुनाच्या गुन्ह्यांची नोंद झाली आहे. या सर्व प्रकरणात पोलिसांनी तपास करून आरोपींना अटक केली. नोव्हेंबर 2024 पर्यंत 29 खून झाले आहेत. पोलिसांनी सर्व प्रकरण उघडकीस आणून आरोपींना अटक केली आहे.



### आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर

फॉरेन्सिक, तांत्रिक आणि शास्त्रोक्त पद्धतींचा वापर करून पोलिसांनी गुन्हेगारांचा सुगावा लावला. याव्यतिरिक्त, गुन्ह्याच्या ठिकाणी सापडलेले पुरावे आणि साक्षीदारांकडून मिळालेल्या माहितीमुळे गुन्हे उघडकीस आणण्यात मदत झाली. पोलिसांनी खुनाच्या गुन्ह्यांमध्ये सखोल अभ्यास करून गुन्हेगारांच्या नेटवर्कवर बारीक नजर ठेवली, त्यामुळे आरोपींना पकडण्यात यश आले.

### खुनाच्या प्रयत्नाचे 57 गुन्हे

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा खुनाच्या प्रयत्नाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. गेल्या वर्षी 36 गुन्हे घडले होते. तर यावर्षी 57 गुन्हे दाखल झाले आहेत. गेल्या वर्षीही पोलिसांनी सर्व गुन्ह्यांचा तपास करून आरोपींना अटक केली होती. तसेच यावर्षी 57 गुन्हे पोलिसांनी उघड केली आहेत.

### 2023 आणि 2024 मधील गुन्हे

| गुन्हे | वर्ष 2023 | वर्ष 2024 |
|---|---|---|
| खून | 51 | 29 |
| खुनाचा प्रयत्न | 36 | 57 |
| सदोष मनुष्यवध | 8 | 9 |
| बलात्कार | 104 | 117 |
| दरोडा | 2 | 6 |
| दरोड्याची तयारी | 2 | 1 |
| जबरी चोरी | 21 | 24 |
| घरफोडी | 135 | 128 |
| एकूण चोरी | 922 | 809 |
| दुचाकी चोरी | 197 | 207 |
| दंगल | 75 | 61 |
| दुखापत | 1242 | 1288 |
| सरकारी कर्म. हल्ला | 45 | 37 |
| विनयभंग | 281 | 266 |
| अपघातात मृत्यू | 314 | 280 |
| भाग 5 पर्यंत एकूण | 4132 | 3984 |
| एकूण गुन्हा | 7567 | 7303 |

गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा गुन्ह्यांचा आलेख घटला आहे. प्रतिबंधात्मक कारवाईमुळे दुखापतीच्या गुन्ह्यात मोठी घट झाली आहे. प्रत्येक तक्रारींवर तत्काळ दखल घेत पोलिसांनी कार्यवाही केल्यामुळे गुन्हेगारीवर अंकुश निर्माण होत आहे.

**विशाल आनंद, पोलिस अधीक्षक, अमरावती ग्रामीण**

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# महापरिनिर्वाण दिन : हजारो भीम अनुयायी मुंबईला रवाना

## चैत्यभूमीवर आज बाबासाहेबांना अर्पण करणार आदरांजली

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 )** - भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अमरावती रेल्वे स्थानकावरून हजारो आंबेडकरी अनुयायी 5 डिसेंबर रोजी मुंबईकरीता रवाना झाले. यात लहान बालकापासून महिला तसेच वयोवृद्ध अनुयायांचा प्रामुख्याने समावेश होता.खासदार बळवंत वानखडे यांनी अमरावती रेल्वे स्थानकावर प्रत्येक डब्यामध्ये जाऊन प्रवाशांची आस्थेने चौकशी केली. तसेच खासदार मित्रपरिवारातर्फे पाण्याच्या बॉटल चे वाटप करण्यात आले. अमरावती रेल्वे स्थानकावरून विशेष रेल्वेची व्यवस्था मुंबईकरीता करण्यात आली आहे. महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी दादर येथे 6 डिसेंबर रोजी बाबासाहेबांना अभिवादन केले जाणार आहे.





### शहरात तगडा बंदोबस्त

दरम्यान शहरातही अभिवादनाचा कार्यक्रम ठिकठिकाणी असतो. त्यामुळे कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. संवेदनशील परिसरात चौका चौकात सशस्त्र पोलीस बल देखील तैनात करण्यात आले आहे. 1800 पोलीस कर्मचारी तसेच होमगार्ड देखील बंदोबस्तावर आहेत. आरक्षित पोलीस बलाच्या तीन तुकड्या देखील तैनात आहेत. एस आर पी 3 प्लाटून आणि 300 होमगार्ड विविध चौकात आणि फिक्स पॉईंट वर सुरक्षेच्या दृष्टीने परिस्थितीवर लक्ष ठेवून राहणार आहेत. यासह ड्रोन कॅमेरा च्या मदतीने शहरातील विविध भागावर निगराणी ठेवली जाणार आहे. शहरात कुठलीही अनुचित घटना घडू नये आणि कायदा व सुव्यवस्था कायम राहावी यासाठी पोलीस बलाने विशेष खबरदारी घेतली आहे. दरवर्षी अभिवादनासाठी स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक आणि भीम टेकडी परिसरात भीम अनुयायी मोठी गर्दी करत असतात. त्यामुळे पोलीस प्रशासनाने विशेष खबरदारी घेऊन सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना केल्या आहेत.

### काही ठिकाणी काळा दिवस

बाबरी मज्जिद देखील 6 डिसेंबर रोजीच पाडण्यात आली होती. त्यामुळे काही ठिकाणी काळा दिवस साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने देखील पोलीस विभाग विशेष खबरदारी घेत आहे. संवेदनशील भागात पोलिसांचे विशेष लक्ष आहे.

# प्रामाणिक सेवावृत्ती हीच कर्तव्यपूर्तीचे समाधान आहे- प्रकाश विंचूरकर

## मुख्याध्यापक श्रीधर राऊत यांचा सेवानिवृत्ती सोहळा

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड, ( दि.5 )** - आज प्रामाणिकपणा जेवढा शिल्लक आहे त्याच बळावर जगाचे रहाटगाडगे चालु आहे. शासकीय सेवेत सचोटीने कार्य करीत राहणे ही प्रामाणिक सेवावृत्ती जपल्यास प्रत्येकाला कर्तव्यपुर्ती चे समाधान लाभते. हेच समाधान सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य सुखकर करुन जाते अशा आशयाचे प्रतिपादन आदर्श शिक्षक प्रकाश विंचूरकर यांनी व्यक्त केले.

जिल्हा परिषद शाळा अमडापुर येथील मुख्याध्यापक श्रीधर राऊत यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने आयोजित सेवापुर्ती सोहळ्यात विंचूरकर प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यशवंत बाबा विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक श्री देवघरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या सेवापुर्ती सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आश्रमशाळा भोकरबर्डीचे मुख्याध्यापक सुभाष गणोरकर, वांदे , बनसिंगे सर,माजी मुख्याध्यापक लक्ष्मीकांत देशमुख आदी व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी प्रशांत सेंदरकर,भारती चिखले,राहुल राऊत,रंजन राठोड, निखिल उमाळे आदींनी आपल मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष देवघरे सर,सुभाष गणोरकर सर,वांदे सर, बनसिंगे सरांची समायोचित भाषणे झालीत. प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष देवघरे यांनी मुख्याध्यापक श्रीधर राऊत व त्यांच्या अर्धांगिनी कल्पना श्रीधर राऊत यांचा शाल श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. याप्रसंगी श्रीधर राऊत यांच्या 37 वर्षे सेवा काळातील आठवणींना मान्यवरांनी आपल्या भाषणातून उजाळा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वंदना दिनेश राऊत यांनी केले.प्रास्ताविक व शारदा स्तवन दिनेश राऊत यांनी केले. या आदर्शमय सेवापुर्ती सोहळ्याचे आयोजन ऋजुजा निखील उमाळे, तन्वी राऊत, निखील उमाळे यांनी केले. मारोतराव खेरडे सभागृहाच्या लॉन वर झालेल्या या कर्तव्यपूर्ती सोहळ्याला जिल्हा परिषद,खाजगी शाळांचे शिक्षक शिक्षिका शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते. असंख्य शिक्षकांनी श्रीधर राऊत यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.




# हॉटेल तथा ढाब्यावर दोन सीसीटीव्ही कॅमेरे लावावेत

## मोर्शीचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या ढाबा संचालकांना सूचना



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.5 )-** मोर्शी शहरात घडणाऱ्या गुन्ह्यावर काही प्रमाणात आकुंश लागावा,चोरट्यांचा तपास जलदगतीने व्हावा, त्यांची ओळख लवकर पटावी यासाठी शहरातील धाबे चालकांनी आपल्या धाब्यावर दोन सीसीटीव्ही कॅमेरे लावावे अशा सूचना मोर्शी पोलीस स्टेशन तर्फे देण्यात आल्या आहेत.

पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामीण यांचे सूचने प्रमाणे मोर्शी पोलीस स्टेशन येथे दि. 02 डिसेंबर 24 ला झालेल्या हॉटेल तथा ढाबा संचालकांच्या सभेत मोर्शी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील सर्व हॉटेल व ढाबा संचालक यांनी सीसी टीव्ही लावावे अशा सूचना देण्यात आल्यात.

पोलीस स्टेशन मोर्शी हद्दीत घडणाऱ्या चोरी व इतर घटना यांच्यावर अंकुश लावून त्या घटनेतील आरोपी ओळख पटविण्या करिता सर्व हॉटेल व ढाबा संचालक यांना दोन सीसी टिव्ही पोलीस विभागाकरिता लावावे तसेच रोड वरून जाणारे वाहने सीसी टिव्ही कॅमेऱ्यात दिसेल अशा दिशेने सीसी टिव्ही कॅमेरे लावावे, त्याचबरोबर संशयास्पद इसम आढळ्यास पोलिसांना माहीती द्यावी, यासारख्या इतर महत्वाच्या सूचना हॉटेल संचालक यांना मोर्शी चे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी दिल्या. सदर सभेला मोर्शी परिसरातील 20 ते 25 हॉटेल संचालक हजर होते.

# 5 हजार सरकारी शाळांना निवडणुकीनंतर पहिला दणका

## गरिब कुटुंबातील विद्यार्थ्यांची सज्ञान पिढी घडविण्यालाच सुरुंग

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.5 )** - विधानसभा निवडणुकीनंतर 10 पेक्षा कमी पटसंख्येच्या सुमारे 5 हजार शाळांना पहिला दणका बसणार असून या शाळा वाडी, शहरालगतच्या झोपडपट्टीची वस्ती, आदिवासी पाडे, वंजारी समाजाचे तांडे, लहान गावांतल्या शाळांसह दलित वस्तीतल्या एकूण 5 हजार सरकारी शाळांतील शिकविण्याची जबाबदारी शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या कंत्राटी शिक्षकांच्या ताब्यात देण्यात येणार आहे. यातून गरीब वस्तीतील कुटुंबातली सज्ञान पिढी घडविण्याच्या संकल्पनेलाच सुरुंग लागण्याची भीती निर्माण झाली आहे. यानंतर 20 पेक्षा कमी पटसंख्येच्या सुमारे 14 हजार सरकारी शाळांवर गंडांतर येणार आहे. यातून या शाळांतून शिक्षण घेणाऱ्या किमान पावणे दोन लाख गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक दर्जा घसरुन बसणार आहे. 10 पेक्षा कमी पटसंख्येच्या शाळांतील विद्यार्थ्यांना शिकविण्याची जबाबदारी 15



हजार रुपये दर महिन्यांच्या वेतनावर 1 वर्षाकरिता नियुक्त केलेल्या शिक्षकांवर सोपविली जाणार आहे. या शिक्षकांकरिता किमान शैक्षणिक पात्रता अटही शिथिल केली गेली आहे. या सरकारी धोरणाच्या अंमलबजावणीची सुरुवात करण्याचा फतवा सांगली जिल्हा परिषदेने काढला आहे. याकरिता पहिला शासकीय आदेश 15मार्च 2024 रोजी काढला गेला होता. दुसरे परिपत्रक शालेय शिक्षण तसेच क्रीडा संचलनालयाने 26 ऑक्टोबर 2024 रोजी काढले. त्यात 24 डिसेबर 2024 पूर्वी एक वर्षाकरिता कंत्राटी शिक्षक नियुक्त केले जावेत, असे नोंदविले आहे.

> “कमी पटसंख्येच्या शाळांतील नियमित शिक्षक इतर शाळांत बदलविले जाणार आहे. या धोरणाने वाडी. वस्ती, तांडे, पाडे, दलित वस्तीत हलाखीचे जीवन जगणाऱ्या कुटुंबातील विद्यार्थ्यांचे शिक्षण प्रभावित होणार. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास, शिक्षणाचे सामाजिकीकरण, या धोरणासोबत विसंगत आहे. एक वर्षाचा कंत्राटी शिक्षक बदलून किंवा नोकरी सोडून गेल्यास या विद्यार्थ्यांच्या पूर्वीच्या शैक्षणिक दर्जाची जबाबदारी कोणावर, हाही प्रश्नच आहे. समाजातील घटकांनी याबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.
>
> **विजय कोंबे,**
> **राज्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांच्या कमी पटसंख्येची अट फक्त सरकारी शाळांनाच असून खासगी शाळांना ही पटसंख्येची अट लागू नाही. पटसंख्येच्या निकषावर सरकारी शाळा बंद करून प्राथमिक शिक्षणाचे क्षेत्र पूर्णपणे कार्पोरेट क्षेत्राच्या हवाली करण्याच्या शासकीय धोरणाचा यातून संशय यायला लागला आहे.

यात संविधानातील कलम 21 (अ), विद्यार्थ्यांच्या मोफत शिक्षणाचा हक्क कायदा 2009 बासनात गुंडाळले जात असल्याचेही भान राखले गेले नाही. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात, याच उक्तीप्रमाणे महायुती सरकारचे पाय धोरणात दिसू लागले आहेत. यात शैक्षणिक नुकसान होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सज्ञानतेलाच सुरुंग लागून या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे भवितव्य अंधारात लोटण्याचाच हा प्रकार आहे. पालकांनी याबाबत लगेचच सावध होण्याची गरज आहे. अज्ञानी घडविण्याचाच हा प्रकार आहे.

### प्रजापती ब्रह्मकुमारी संस्थेतर्फे सुदर्शन गांग यांचा सत्कार

**अमरावती** - शहरातील भारतीय जैन संघटनेच्या राष्ट्रीयकार्यकारिणीत विश्वस्त म्हणून कार्यरत असलेले तसेच पाणी फाउंडेशनसाठी विविध सामाजिक कार्यक्रम राबविणारे सुदर्शन गांग यांचा प्रजापती ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयातर्फे सत्कार करण्यात आला. ब्रह्मकुमारी संस्थेच्या रुक्मिणीनगर शाखेत मुख्य प्रशासिका संतोष दीदी यांच्या हस्ते शंभरहून अधिक सामाजिक कार्यकत्यांचा सत्कार करण्यात आला आहे. यावेळी मंचावर सीता दीदी, रजनी दीदी, संभाजीराव ठाकरे, नवनाथ जगताप, लप्पी जाजोदिया आदी उपस्थित होते.

# रेल्वेखाली कटला युवक



**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, ( दि.5 )-** धामणगाव रेल्वे जीआरपीएफ अंतर्गत तळणी रेल्वे स्टेशनवर गुरुवार (दि.5) रोजी भुसावळ-वर्धा मेमो ट्रेन मधून पडल्याने एका 32 वर्षीय युवकाचा कटून मृत्यू झाला. यावेळी हा युवक आपल्या कुटुंबासह शेगाव येथे दर्शनाला गेला होता अशी माहिती मिळाली आहे.

सचिन चौधरी (रा.शिरपूर हाडे, खेर्डी ता.आर्वी जि.वर्धा) असे या युवकाचे नाव असल्याचे कळते. तळणी रेल्वे स्टेशन जवळ अचानक हा युवक दारातून खाली पडला व दुसऱ्या बाजूने येत असलेल्या रेल्वेचे चाकात सापडला. या घटनेनंतर सदर रेल्वे काही अंतरावर थांबविण्यात आली. जीआरपीएफ पोलिसांना घटनेची सूचना देण्यात आली. या युवकाचा मृतदेह अत्यंत छिन्न विछिन्न झाला होता. आई, बहीण, भाचा अशी जवळपास पंचवीस सहप्रवासी या युवकासोबत होते. या घटनेमुळे काही काळ या रेल्वे स्टेशन परिसरात एकच गोंधळ उडालेला पहायला मिळाला.

# लाडक्या बहिणींना महागाईचा झटका

### तेलाचे दरही गगनाला

### लसुण खातोय भाव

***नितीन दुर्बुडे***

***पथ्रोट,( दि.5 )-गेल्या काही महिन्यांपासून महागाईने सर्वसामान्य त्रस्त झाला आहे. त्यातच आता खाद्यतेल आणि इतर अनेक वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहे. अनेक छोट्या-मोठ्या शहरासह ग्रामीण भागात दिवसभरात 500 रुपयांची नोट सुद्धा कमी पडत आहे. इतके वस्तूंचे भाव कडाडले आहेत. त्यामुळे लाडक्या बहिणींच्या जीवाला घोर लागला आहे.***

सप्टेंबरनंतर राज्यातच नाही तर देशात महागाईने पुन्हा डोकं वर काढलं आहे. भाजीपाल्यासह खाद्यतेल, दैनंदिन जीवनातील अनेक वस्तूंचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहे. राज्यातील अनेक शहरासह गावखेड्यात भाजीपाला, किराणा मालाचे दर वाढले आहेत. कांद्याचा थोडा बहूत दिलासा मिळत नाही तोच लसणाने गृहिणींच्या नाके नऊ आणले आहे. खाद्यतेलाच्या किंमतीत भरमसाठ वाढ झाल्याने घरचे बजेट सांभाळताना लाडक्या बहिणींना मोठी कसरत करावी लागत आहे. या सर्व महागाईत संसाराचा गाडा कसा चालवायचा असा सवाल लाडक्या बहिणी सरकारला विचारत आहेत.



### शेवग्याला विक्रमी भाव

जिल्ह्यात मागील 8 दिवसापुर्वी थंडीचा जोर वाढला असल्याने त्याचाच परिणाम आता थेट भाजीपाल्याच्या दरामध्ये झाल्याचं दिसून येत आहे. शेवग्याचा दर ही ज्यास्त झाल्याने दरवाढीमुळे भाजी मार्केट मधून शेवगाच गायब झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. बाजारात आवक कमी असल्याने सर्वाधिक पोषण मुल्य असलेल्या शेवग्याचे दर वाढले आहेत. पुढील एक ते दीड महिना हे भाव स्थिर राहणार असल्याच विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे. त्यामुळे प्रचंड दर वाढल्याने नागरिकांनी देखील शेवगा खरेदीकडे पाठ फिरवली आहे. मागील 5 ते 6 दिवसांपासून ग्रामीण भागातल्या आठवडी बाजारात तुरळक ठिकाणी शेवगा दिसून येत आहे. पहिल्यांदाच शेवग्याला विक्रमी भाव मिळत आहे.

### खाद्यतेलाने आणले जेरीस

तेलाच्या दरवाढीमुळे ग्राहकांची डोकेदुखी वाढली आहे. गृहिणींचे बजेट कोलमडले आहे. गणपती उत्सवापासून आतापर्यंत तेलाचे दर झपाट्याने वाढले आहेत. सध्या मार्केटमध्ये सूर्यफूल तेलाचा 15 किलोचा भाव 2280 रुपये, पाम तेलाचा 2180 रुपये, तर सोयाबीन तेलाचा भाव 2050 रुपये आहे. व्यापार्यांमच्या मते पाम तेलाच्या दरात तब्बल 300 रूपयांची वाढ झाली असून, सूर्यफूल तेलावर 25 टक्के आयात शुल्क लावल्यास दर आणखी वाढण्याची शक्यता आहे. सध्या तरी सोयाबीन तेलाचे भाव कमी आहे.

### पालेभाज्यांचा दिलासा

हिवाळ्यामुळे पालेभाज्यांच्या दरात मोठी घसरण झाली आहे. भाजी बाजारात हिवाळा सुरू असल्याने पालेभाज्यांची बर्यायच शेंगभाज्या मोठ्या प्रमाणात आवक वाढली आहे. त्यामुळे पालेभाज्यांच्या किमतींमध्ये 30ञ घट झाली आहे सध्या पालेभाज्या प्रति जुडी 10 रुपये दराने विकल्या जात आहे. मागील दिवसाच्या तुलनेत हा दर खूपच कमी आहे. लसणाचा भाव वधारला असुन लसुण भाव खातोय. ठोक बाजारपेठेत सध्या लसणाचे दर 350 ते 400 रुपये प्रतिकिलोपर्यंत पोहोचले आहेत. गेल्या काही आठवड्यांच्या तुलनेत लसणाच्या दरात प्रति किलो 20 रुपयांची वाढ झालेली आहे. व्यापार्यायच्या म्हणण्यांनुसार, सध्या बाजारात लसणाचा पुरवठा कमी असल्याने भाव वाढले आहेत.



# विद्यार्थ्यांच्या श्रमदानातून पाणी अडवा, पाणी जिरवा चा संदेश

## मालखेड येथे कृषी सहाय्यकांच्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी उभारला वनराई बंधारा

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे, ( दि. 5 )** - तालुक्यातील मालखेड ग्रामपंचायत हद्दीतील भानामती नदीवर कृषी विभागाचा वतीने कृषी सहाय्यक पवनसिंह राठोड यांनी शेतकऱ्यांसोबतच विद्यार्थ्यांनाही मोलाचे मार्गदर्शन करत कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांच्या उत्पन्न वाढीसाठी तसेच पाणी अडवा, पाणी जिरवा आणि पाण्याचा जपून वापर करा हा संदेश देत स्थानिक

वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी श्रमदानातून आणि लोकसहभागातून वनराई बंधारा टाकण्यात आला. नदीवर पाणी साठवणुकीची व्यवस्था नसल्याने पाणी वाहून जाते, परिणामी उन्हाळ्यात वन्यजीवांना, तसेच गावकऱ्यांनाही पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. पाण्यासाठी होणारी पायपीट थांबावी, यासाठी वनराई बंधारा बांधून कृषी विभाग, विद्यार्थी आणि गावातील लोकांचा श्रमदानाने पाणी अडवण्याचे या बंधाऱ्यामुळे शक्य झाले. भू आणि जलसंधारणाच्या स्थायी उपचाराबरोबरच अत्यंत अल्प खर्चात, भरपूर पाणीसाठा निर्माण केला जाऊन उत्पादन व रोजगार निर्मितीबरोबरच जनावरांसाठी आणि काही प्रमाणात शेतीला संरक्षित सिंचनासाठी वनराई बंधाऱ्याचा उपयोग होतो.यावेळी वं. रा. तुकडोजी महाराज विद्यालयातील मुख्याध्यापक आशिष देशमुख, ग्रामपंचायत अधिकारी मदनगोपाल गवळी, ग्राममहसूल अधिकारी प्रफुल गेडाम, ग्रामरोजगार सेवक गजानन बागडे तसेच इतर शिक्षकवृंद, देखील उपस्थित होते.

> “बंधाऱ्यामुळे पाणी जमिनीत मुरते, आसपासच्या विहिरींचे व कूपनलिकांचे पाणीही वाढते. खरीप हंगामातील तूर, कापूस तसेच रब्बी हंगामातील हरभरा पिकांना संरक्षित पाणी उपलब्ध होऊन उत्पादन वाढीबरोबरच स्थानिक रोजगार निर्मिती सोबतच शेतकऱ्यांच्या उत्पन्नात देखील वाढ होते हेच महत्व विद्यार्थ्यांनी लक्षात घेऊन वनराई बंधारा उभारण्यात श्रमदान केले.
>
> **पवनसिंह राठोड,**
> **कृषी सहाय्यक , मालखेड रेल्वे**